जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४४५ दिनांक - २०/०६/२०२३**

## कोंढवा पोलीस स्टेशन,पुणे शहर

## पुणे शहरातुन तडीपार करण्यात आलेल्या आरोपीस कोंढवा पोलीसाकडुन अटक.

कोंढवा पोलीस ठाणे हद्दीतील तडीपार आरोपी व रेकार्ड वरिल आरोपी यांना चेक करण्याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष सोनवणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे)संजय मोगले, पोलीस निरीक्षक (गुन्हे) संदिप भोसले यांनी सुचना दिल्या होत्या. सदर सुचनाप्रमाणे तपास पथक अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक अनिल सुरवसे, हे पोलीस अंमलदार असे कोंढवा पोलीस ठाणे हद्दीमध्ये पेट्रोलिंग करुन रेकार्डवरिल आरोपी चेक करित असताना दि.१९/०६/२०२३ रोजी लुल्लानगर चौकात आलो असता सहा.पोलीस निरीक्षक अनिल सुरवसे, यांना बातमीदाराकडुन बातमी मिळाली की, वानवडी पोलीस ठाणे कडुन पुणे शहरातुन एक वर्षेकरिता तडीपार करण्यात आलेला आरोपी नामे जयेश सुनिल भंडारी, वय २२ वर्षे, रा. रुख्मिनी निवास, अबन्डंट लाइफ स्कुलच्या मागे, कृष्णानगर,मंहमदवाडी, पुणे हा त्याच्या घराच्या जवळ उभा आहे.

सदर बातमीच्या अनुषंगाने बातमीच्या ठिकाणी जावुन खात्री करता रुख्मिनी निवास, येथे आरोपी जयेश सुनिल भंडारी हा उभा असल्याचे दिसले.त्यास ताब्यात घेवुन त्याचे नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव पत्ता **जयेश सुनिल भंडारी, वय २२ वर्षे, रा. रुख्मिनी निवास, अबन्डंट लाइफ स्कुलच्या मागे, कृष्णानगर, मंहमदवाडी, पुणे** असे असल्याचे सांगितले. त्यास कोंढवा अगर पुण्यामध्ये येण्याकरीता मा.न्यायालयांची अगर मा.पोलीस उप आयुक्त परि-५ पुणे शहर यांची पुर्व परवानगी घेतली आहे काय? याबाबत विचारणा करता त्याने कुठलीही परवानगी घेतली नसल्याचे सांगितले. सदर आरोपी हा तडीपार कालावधीत कोणत्याही परवानगी शिवाय आला असल्याने त्याच्या विरुध्द महाराष्ट्र पोलीस कायदा कलम.१४२ प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

सदरची कारवाई मा.अपर पोलीस आयुक्त पुर्वे प्रादेशिक विभाग श्री रंजनकुमार शर्मा मा.पोलीस उप आयुक्त परि.०५, श्री विक्रम देशमुख, मा.सहा.पोलीस आयुक्त वानवडी विभाग श्री.शाहुराजे साळवे यांच्या मागदर्शनाखाली करण्यात आली आहे.